# महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ,

विभागीय कार्यालय, पुणे विभाग,

५८१/४, प्लॉट नं.३७ ते **५४ मार्केट यार्ड**, पी.एम.टी बस डेपो समोर, **पुणे -४११०३७**

मो.न – 9022008207/9834984856

Email:- pune.ro@mswc.in

**Website: mswarehousing.com**


---

## अल्प मुदतीची निविदा (**Short Tender Notice**)

महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या भोसरी वखार केंद्र, पुणे-नाशिक महामार्ग, पांजरपोळ जवळ, भोसरी, पुणे-३९ येथील गोदामे AS IS WHERE IS / लॉक अँड की पद्धतीने ५ वर्षांसाठी (३+२) भाडेतत्त्वावर देण्याचे नियोजन आहे. **किमान भाडे:** रु. १६.५० प्रति चौ.फुट/माह + GST, दरवर्षी किमान ५% वाढ. **पात्रता:** वार्षिक उलाढाल किमान रु.१ कोटी असलेल्या औद्योगिक संस्था, व्यापारी, सहकारी संस्था, कारखाने, खत कंपन्या व शेतमाल उत्पादक संस्था यांना साठवणुकीसाठी जागा देणे आहे. निविदाकार गो.क्र. २,४,५,६ साठी प्रत्येकी १०,००० चौ.फुट जागा तसेच गो.क्र.७ साठी १६,००० चौ.फुट जागा किंवा सर्व गोदामांसाठी एकत्रित कमाल ५६,००० चौ.फुट. जागेची मागणी करू शकतात. **सुरक्षा तारण:** ६ महिन्यांचे भाडे विनाव्याज जमा करणे आवश्यक. मालाचा विमा, सुरक्षा, पाणी व वीज खर्च ठेवीदाराच्या जबाबदारीचा राहील. लिफाफा क्र. १: गोदाम क्र./ क्षमता व GST सहित भाडे दर व लिफाफा क्र. २ मध्ये मागील तीन वर्षांचे Audited Reports, IT Returns, GST प्रमाणपत्र व आवश्यक कागदपत्रे दोन्ही लिफाफ्यासह (सुट्टीचे दिवस सोडून) निविदा दि. ०३.०९.२०२६ ते १६.०९.२०२६ रोजी दुपारी २.०० वा.पर्यंत विभागीय कार्यालय, पुणे येथे सादर कराव्यात. निविदा दि. १६.०९.२०२६ रोजी दुपारी ४.०० वा. उघडण्यात येतील. अटी व शर्ती महामंडळाच्या www.mswarehousing.com या संकेतस्थळावर पाहता येतील

- गोदामामध्ये Galvalume Clip-lock Roofing, Wall Cladding, Tremix Flooring व Ventilators सुविधा उपलब्ध आहे. तसेच, निविदाकाराने प्रत्यक्ष साइट वर भेट देऊन पाहणी/खात्री करणे आवश्यक आहे.
- निविदा स्वीकारणे/नाकारण्याचा अधिकार महामंडळाकडे राखीव आहे.

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

**भोसरी वखार केंद्रावरील गोदाम भाड्याने (लॉक ॲण्ड की तत्वावर) देणेबाबत संकेतस्थळावर प्रसिद्ध करावयाच्या अटी व शर्ती**

- भोसरी वखार केंद्रावरील गोदाम साठवणूक सुविधा **'जसे आहे तसे'** पद्धतीने लॉक ॲण्ड की तत्वावर किमान भाडे दर रु.१६.५० पैसे प्रती चौ फुट प्रती माह किंवा त्यापेक्षा जास्त दराने तसेच, भाडे दरात किमान प्रती वर्षी ५% दरवाढीने पाच वर्ष कालावधी करिता (३+२) मालाची साठवणूक करणे साठी देण्याचे नियोजन आहे.
- सिलबंद लिफाफ क्र. १ मध्ये दरपत्रक स्वीकारले जाईल.आणि लिफाफा क्र. २ मध्ये दरपत्रकासोबत इच्छुक निविदाकाराने / दरपत्रकदराने त्यांचे १ कोटी किंवा त्यापेक्षा जास्त आर्थिक उलाढालीबाबतचा तीन वर्षाचा ऑडीट रिपोर्ट आणि आय टी रिटर्न ची प्रत तसेच जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र इत्यादी आवश्यक कागदपत्रे जोडणे बंधनकारक आहे.
- गोदाम जसे आहे त्या स्थितीत ताब्यात देण्यात येईल. तथापि भाडे तत्वावरील कालावधी समाप्तीनंतर महामंडळाच्या मालमत्तेचे काही नुकसान झाल्याचे निदर्शनास आल्यास ठेव रकमेतून सदरच्या दुरुस्तीचा खर्च वसूल करण्यात येईल.
- लॉक-इन कालावधी – ३६ महिने एवढा असेल.
- गोदाम इमारतीचा विमा महामंडळाकडून केला जाईल.
- गोदामाची किल्ली व कुलूप ठेवदाराकडे असेल.पण आपत्कालीन परिस्तिथीत एक किल्ली साठा अधिक्षक यांच्याकडे द्यावी लागेल.
- गोदामातील साठ्याच्या देखभालीसाठी एकूण मनुष्यबळाचा खर्च व इतर खर्च ठेवदाराकडून केला जाईल.
- आरक्षण कालावधी पूर्ण झाल्यावर महामंडळ आणि ठेवदार यांच्यात परस्पर संमतीने करार नव्याने नुतनीकरण केला जाऊ शकतो.
- यशस्वी दरपत्रकाला आरक्षण मंजुरी पत्र देण्यात आल्यानंतर त्यांनी त्वरित संमतीपत्र देऊन व ६ महिने च्या भाडे एवढी रक्कम विना व्याज सुरक्षा ठेव रक्कमेचा भरणा करुन गोदामाचा ताबा घेण्यात यावा. आणि ताबा पावती संबंधित केंद्र प्रमुखांकडे द्यावी.
- ठेवीदाराला लॉक ॲण्ड की भाडेतत्वावर घेतलेल्या गोदामाचा १५ दिवसांत नोंदणीकृत करारनामा करणे बंधनकारक आहे.सदर करारनामा नोंदणीचा व मुद्रांक शुल्काचा व त्या अनुषंगीक इ. बाबींचा सर्व खर्च ठेविदार यांनी करावा.
- करारनाम्यात नमूद दराने प्रत्येक महिन्याला १० तारखेपर्यंत गोदाम भाडे रक्कम महामंडळाच्या खात्यावर RTGS/NEFT द्वारे जमा करणे ठेविदार यांना बंधनकारक राहील.
- करारनाम्यात नमूद केलेल्या दराने जर ठेविदाराकडून भाडे प्राप्त झाले नाही. तर सदर भाडे वसुली करिता महामंडळाकडून कायदेशीर प्रक्रिया राबविणे करिता ठेवीदाराची कोणतीही हरकत राहणार नाही. ठेवीदारांची KYC विभाग प्रमुख यांच्या स्तरावर करण्यात यावी.
- ठेविदार यांनी साठवलेल्या मालाचा विमा उतरावा व सदर विम्याची प्रत संबंधित केंद्र प्रमुख, यांच्याकडे १५ दिवसात सादर करावी.
- Lock in period समाप्त झाल्यानंतर करारनामा रद्द करावयाचा असल्यास ठेविदार कडून ३ महिने आधी नोटीस दिली जाईल किंवा वखार महामंडळास गोदामाची आवश्यकता भासल्यास महामंडळाकडून कंपनीला १ महिना आधी नोटीस दिली जाईल. त्याप्रमाणे कंपनीने सदर गोदामाचा ताबा विना अट महामंडळाकडे परत सुपूर्द करण्यात येईल, याबाबत शपथपत्र द्यावे.
- सदर आरक्षित जागेतील साठवणूकी मुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे ठेविदार यांना तोटा झाल्यास त्यास महामंडळ जबाबदार राहणार नाही .
- सदर आरक्षित जागेत साठवणूकीमुळे महामंडळाच्या वखार केंद्रावर निर्माण होणा ऱ्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी ठेविदार यांची राहील . तसेच वखार केंद्र परिसरात घाण होणार नाही याची ठेविदार यांनी काळजी घेऊन आवश्यक ती उपाययोजना करावी.
- ठेविदार यांना व्यवसायासाठी लागणाऱ्या प्राथमिक तसेच आवश्यक सोयी जसे स्वच्छतागृह, पाणी, वीज, इत्यादी ठेवीदाराने स्वत:च्या खर्चाने उपलब्ध करुन घ्यावयाच्या आहेत.

- महामंडळाच्या वखार केंद्रांच्या प्राथमिक बाह्य सुरक्षिततेची जबाबदारी महामंडळाची राहील. तसेच गोदामाच्या अंतर्गत सुरक्षिततेची जबाबदारी ठेविदार यांची राहील. आवश्यकतेनुसार ठेवीदाराने सुरक्षितेच्या दृष्टिने स्व:खर्चाने सीसीटीव्ही कॅमेरा बसवून घ्यावा.
- विद्युत पुरवठा तसेच शासकीय परवाने / परवानग्या घेण्याची जबाबदारी ठेविदार यांची राहील. त्यासाठी आवश्यक असणाऱ्या परवानग्या महामंडळाकडून देण्यात येतील एकुण भाडे देयकावर १०% टीडीएस करुन प्रमाणपत्र संबंधित केंद्रप्रमुख, वखार केंद्र यांचेकडे सादर करावे.
- निविदा धारकाने जाहिरातीत नमूद केलेली सुविधेची प्रत्यक्ष साईट वर भेट देऊन पाहणी / खात्री करावी त्यानंतरच निविदा सादर करण्यात यावी.
- ठेविदार यांना सदरचे आरक्षणाबाबतच्या वर नमूद अटी व शर्तींच्या आधीन राहून मान्य असल्याबाबतचे संमतीपत्र महामंडळास त्वरीत सादर करावे लागेल.